Acceptance speech on the occasion of Karmveer Bhaurao Patil National Award May 9, 2017 ar Satara

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या नावाचा हा राष्ट्रीय पुरस्कार मा. शरद पवार साहेब यांच्या शुभहस्ते मला प्रदान करून आपण सर्वांनी मला गौरवांन्वित केले या बद्दल मी आपले सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो. रयत शिक्षण संस्था, तिचे सर्व पदाधिकारी व निवड समिती यांनी माझी निवड करायचे ठरवले या त्यांच्या माझ्याबद्दलच्या विश्वासास सदैव पात्र रहाण्याचा माझा प्रयत्न राहील. आपण दिलेल्या या पुरस्काराचा मी अत्यंत नम्रपणे स्वीकार करतो.

आज कर्मवीरांची ५८वी पुण्यतिथी. या दिनी येथे येऊन त्यांच्या पुण्यस्मृतीस विनम्र अभिवादन करण्याची संधी मला मिळाली हे मी माझे मोठे भाग्य समजतो.

कर्मवारांनी समाजाला व पर्यायाने देशाला पुढे नेण्यात शिक्षणाचे महत्व सुमारे शंभर वर्षापूर्वीच ओळखले व सर्व स्तरांपर्यंत, विशेषत: सर्वात खालच्या स्तरापर्यंत शिक्षण पोचविण्याचे महत्वपूर्ण कार्य आपल्या जीवनाचे मिशन म्हणून अंगिकारले. आज रयत शिक्षण संस्था अशियातील सर्वात मोठी एक शिक्षण संस्था म्हणून अग्रेसर आहे. मा. श्री. शरद पवार साहेब व स्व. रावसाहेब शिंदे यांच्या प्रेरणेने गेल्या काही वर्षात रयतशी माझा बराच जवळचा संपर्क आला. रयतच्या कार्याचा आवाका पाहून प्रत्येक वेळी रयत बद्दल चा माझा आदर व्दिगुणितच होत आलेला आहे.

कर्मवीरांनी तळागाळा पर्यंत शिक्षण पोचविण्याच्या कार्याची मुहूर्तमेढ सुमारे शंभर वर्षा पूर्वीच केली असली तरी सर्वत्र चांगले शिक्षण उपलब्ध करून देण्या बाबत अजूनही आपल्याला बराच पल्ला गाठायचा आहे. आजच्या ज्ञान युगात शिक्षणाचे महत्व पूर्वी कधी नव्हते इतके वाढले आहे. आपल्या आजच्या तरुण पीढीला नवीन संदर्भात सक्षम करायचे झाल्यास त्यांची ज्ञानाच्या नवीन दिशा व रूंदावलेल्या कक्षा यांची सखोल ओळख व त्या आधारे इतरांच्या आधी नवीन तंत्रज्ञान निर्मितीची क्षमता शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण करणे आवश्यक आहे. आजच्या तीव्र जागतिक स्पर्धेत तर ते अनिवार्यच आहे. भारता सारख्या विशाल देशांत, जेथे दोन तृतियांश लोकसंख्या ग्रामीण भागांत वसते व ग्रामीण व शहरी भागातील दरी अजून पण बरीच रुंद आहे, हे आव्हान आपल्या समोर आ वासून उभे ठाकले आहे. नवीन तंत्रज्ञान पुढे येण्याचा वेग दिवसे दिवस वाढतोच आहे हे लक्षांत घेतल्यास इतर पुढारलेल्या देशांच्या तुलनेत आपण आपल्या नवीन पीढीच्या शैक्षणिक तयारीत पुढे जात आहोत की मागे पडत आहोत याचा आपण गांभीर्याने विचार करावयास हवा. आताच डा अनिल पाटील यांनी एकूण शिक्षण परिस्थितीतचा आढावा आपल्या समोर मांडला. त्या अनुषंगाने गंभीर विचार आवश्यकच आहे.

ज्ञान रचनावादी शिक्षण, नवीन तंत्रज्ञानाचा शिक्षणासाठी वापर, शिक्षण व कौशल्य विकास, शिक्षण व सामाजिक विकास अश्या गोष्टींची सांगड शालेय शिक्षणाच्या तसेच शिक्षण, संशोधन, तंत्रज्ञान विकास व उद्योजकता यांची सांगड विद्यापिठीय शिक्षणाच्या संदर्भात आपण घालू शकलो तर बरेच काही साध्य होण्या सारखे आहे. बऱ्याच ठिकाणी असे घडत आहे ही स्वागतार्ह बाब आहे.

कर्मवीरांनी शंभर वर्षांपूर्वी ज्या दूरदर्शी पणे एका विशिष्ट ध्येयाने ठोस पावले उचलली, तशीच ठोस पावले आजच्या नवीन संदर्भात उचलणे अत्यंत आवश्यक बनले आहे असे मला वाटते. आपल्या युवाशक्तीचा ओघ सकारात्मकपणे देशाच्या प्रगतीच्या दिशेने वळविण्याच्या द्रुष्टीने तर ते अपरिहार्यच आहे.

रयत परिवाराचे हजारो सदस्य आज शिक्षण क्षेत्रात आपआपले योगदान देत आहेत. त्या सर्वांना मी अभिवादन करतो. आज आपण माझा एवढा मोठा सन्मान केला त्या बद्दल परत एकदा आभार व्यक्त करून मी येथेच थांबतो.

धन्यवाद.